N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** यावल **Year (वर्ष):** 2022
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0089 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/02/2022 21:07 वजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 22/02/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/02/2022
**Time From (वेळेपासून):** 11:15 वजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:35 वजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/02/2022 **Time (वेळ):** 18:28 वजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 016 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/02/2022 18:28 वजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 14 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** किनगांव ड बोराळे यांचे दवाखा
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** सुपडु उत्तम पाटील
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1965 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रानायगांव ता यावल,यावल,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रानायगांव ता यावल,यावल,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जाहंगीर बाहदुर तडवी | | | 1. मालोद ता यावल,यावल,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | मनोहर दयाराम महाजन | | | 1. किनगाव ता यावल,यावल,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील फिर्यादी यांचे सावखेडा शिवारात शेतगट क्र 281 मधील 1 हेक्टर 21 आर शेत जमीनीची 7/12उता-यावरील ईतर अधिकारी नोंद मधील तक्रारदार यांची बहीन कमलाबाई ईचे नाव मडळ अधिकारी किनगांव यांचे कडुन कमी करुन आणुन देतो असे सांगुन कोतवाल जहांगीर तडवी यांनी फिर्यादी कडे 5000/- रु ची लाचेची मागणी केली त्याबाबत फिर्यादी दि. 22/02/2022 रोजी ला.प्र.विभाग जळगाव कार्यालयाकडे लेखी तक्रार दिली होती सदर तक्रारदाराची दि. 22/02/2022 ला.प्र.विभाग जळगाव पथकाने पंच साक्षीदारासमक्ष पळताळणी केली असता यातील आलोसे यांनी फिर्याद यांच्या सावखेडा शिवारात शेत गट न. 281 मधिल 1 हेक्टर 21 आर शेत जमीनीच्या 7/12 उताऱ्यावरील ईतर अधिकारी नोंद कमी करुन आणुन देण्याचे मोबदल्यात फिर्यादी कडे पंचासमक्ष 5000/- रु.ची मागणी केली सदर लाचेची रक्कम आलोसे क्रं. 1 यांचे मागणे वरुन आरोपी क्र. 2 यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष स्विकारली म्हणुन गुन्हा सदर गुन्ह्याचा पुढील तपास एस.एन. जाधव पोलीस निरिक्षक अँन्टीकरप्शन बुरो जळगाव हे करित आहेत सोबत संगणकावर टंकलिखीत केलेली फिर्याद जोडलेली आहे.

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): vinod madhukar Khandbahale
Rank (पद): SI (Sub-Inspector)
No.(क्र.): DGPVMKM9303 to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

स्वप्न उत्तम पाटील

15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
यावल पो. स्टे. जि. जळगांव

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची)

Name (नाव): SUDHIR Bhimrao PATIL
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): POBN77433

फिर्याद

यावल पोलीस स्टेशन, जि.जळगाव
दिनांक २२.०२.२०२२

मी सुपडु उत्तम पाटील, वय ५७, व्यवसाय शेती, रा.नायगांव ता.यावल जि.जळगांव

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे परिवारासह राहतो.मी दि.२१.०२.२०२२ रोजी सायंकाळी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाचे पोलीस निरीक्षक,एन.एन.जाधव यांचेकडेस दुरध्वनीव्दारे एका लोकसेवकाविरुध्द लाचे संबंधी तोंडी तक्रार केली होती व त्यावेळी मी त्यांना दि.२२.०२.२०२२ रोजी सकाळी ०७.०० वा.नायगांव गावाचे बाहेरील माझे घरी भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे मी दि.२२.०२.२०२२ रोजी सकाळी ०७.०० वा. नायगांव ता.यावल गावाचे बाहेरील माझे घरी उपस्थीत होतो. त्यानंतर काही वेळाने पोनि.एन.एन.जाधव मॅडम, पोनि.बच्छाव साहेब,दोन शासकीय पंच व सापळा पथक असे खाजगी स्कॉर्पिओ वाहनाने सदर ठिकाणी आले. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी पोनि.बच्छाव साहेब तसेच सोबत असलेल्या दोन शासकिय पंचाची,सापळा पथकाची व माझी ओळख करून दिली. त्यानंतर मला त्यांचे खाजगी वाहनात बसवुन माझी लाचे संबधीची तक्रार पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी खाजगी वाहनात सोबत आणलेल्या लॅपटॉप संगणकावर टंकलिखीत करून घेतली ती पुढील प्रमाणे.

समक्ष हजर राहुन तक्रार देतो की, मौजे सावखेडा सिम ता.यावल येथे शेत गट नं.२८१ मध्ये माझी १ हेक्टर २१ आर एवढी शेतजमीन आहे. सदर शेतजमिन मला वडिलोपार्जित वारस हक्काने मिळाली आहे. मला एक विवाहीत बहिण नामे कमलबाई लक्ष्मण पाटील हि असुन ती वडगाव ता.चोपडा येथे तिचे परिवारासह राहते.माझे आई व वडील मयत झाले असुन वर नमुद शेतजमिनीच्या ७/१२ उता–यामधुन त्यांचे नाव कमी होवुन वारस हक्काने माझे व बहीणीचे नाव लागले आहे. मी दि.०९.०६.२०२१ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय यावल येथे दस्त क्र.१०७३/२०२१ नुसार माझ्या बहिणीचे विना मोबदला हक्कसोड पत्र बनवुन ७/१२ उता–यावरील नाव कमी करून घेतले होते. परंतु तरी देखील ७/१२ उता–यावरील इतर अधिकार नोंदमध्ये माझे बहिणीचे नाव दिसत असल्याने माझे बहीणीचे नाव कमी होण्यासाठी मी दि.०३.०८.२०२१ रोजी मा.तहसिलदार यावल यांच्या कार्यालयात योग्य त्या कागदपत्रांसह लेखी अर्ज दिला होता.

मी सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने मला मंडळ अधिकारी,किनगांव यांचे कार्यालयात चौकशीकामी दि.१९.०१.२०२२ रोजी हजर राहण्याची नोटीस मिळाली होती. त्यानुसार मी दि.१९.०१.२०२२ रोजी मंडळ अधिकारी किनगांव यांचे कार्यालयात जावुन मंडळ अधिकारी सचिन जगताप यांना भेटलो.तेव्हा त्यांनी माझे कडे व बहीणीकडे चौकशी करून आमची सही व अंगठा घेतला. त्यानंतर त्यांनी आम्हाला तुमच्या अर्जाची चौकशी करून त्याचा अहवाल तहसिल कार्यालय यावल येथे पाठवुन देतो असे सांगितले होते.

त्यानंतर सदर शेत जमीनीच्या इतर अधिकार नोंद मध्ये माझे बहीणीचे नाव कमी न झाल्याने त्याबाबतची चौकशी करण्यासाठी मी दि.१५.०२.२०२२ रोजी किनगांव येथील मंडळ अधिकारी कार्यालयात गेलो होतो. तेव्हा मला मालोद येथील कोतवाल श्री.जहाँगीर तडवी हे सदर कार्यालयात भेटले. त्यावेळी त्यांनी मला कामाबाबत विचारपुस केली असता मी त्यांना माझे वरील कामाबाबत माहीती दिली. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, मंडळ अधिकारी हे पैसे घेतल्याशिवाय कोणतेच काम करत नाही. तुम्ही माझेजवळ पैसे दिल्याशिवाय तुमचे काम होणार नाही. तुम्हाला जर तुमच्या शेतजमीनीच्या इतर अधिकार नोंदी मधील तुमच्या बहीणीचे नाव कमी करायचे असेल तर त्यासाठी तुम्ही माझे जवळ ५,०००/–रु.आणुन द्या. मी मंडळ अधिकारी यांचे कडून तुमचे काम लागलीच करून आणुन देतो असे सांगितले. तेव्हा मी त्यांना आता माझे जवळ एवढे पैसे नाहीत, मी पैश्यांची जमवाजमव करून तुम्हाला येवुन भेटतो असे सांगुन निघुन आलो होतो.

त्यानंतर काल दि.२१.०२.२०२२ रोजी मी माझे कामानिमीत्त किनगाव येथे गेलो असता तेथे मला कोतवाल जहाँगीर तडवी हे भेटले. तेव्हा कोतवाल,जहाँगीर तडवी यांनी मला सांगितले की, तुम्ही मला नंतर भेटलेच नाही. त्यामुळे तुमच्या कामाबाबत मी मंडळ अधिकारी यांना काही बोललो पण नाही.तुम्ही जर ५०००/–रु. माझे जवळ आणुन दिले तर, मी तुमचे काम लागलीच मंडळ अधिकारी, किनगांव यांचे कडून करून आणुन देतो असे सांगितले. कोतवाल जहाँगीर तडवी हे माझे वर नमुद काम मंडळ अधिकारी किनगांव यांचे कडून करून आणुन देण्याच्या मोबदल्यात माझे कडेस ५,०००/–रु. लाच रक्कम मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. तेव्हा मी त्यांना उद्या पैसे घेवुन येतो असे सांगितले. तेव्हा कोतवाल जहाँगीर तडवी यांनी मला तुम्ही उद्या म्हणजे दि.२२.०२.२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा.नायगांव गावातील मशिद जवळ येवुन भेटा असे सांगितले आहे.

त्यानंतर जाधव मॅडम यांनी मला व पंच क्र. १ यांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करून सदरचे मेमरीकार्ड मध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य घेतले व सदरचे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून ते माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच क्र.१ यांचेसह कोतवाल जहाँगीर तडवी यांची भेट घेण्यासाठी जवळच असलेल्या नायगाव गावातील मशिद जवळ पायी पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे सदर ठिकाणाहुन पायी निघुन नायगाव गावातील मशिद जवळ गेलो. तेव्हा सदर ठिकाणी कोतवाल जहाँगीर तडवी हे दिसुन आले नाही. त्यामुळे मी सदर ठिकाणाहुन माझे मोबाईल फोनवरून कोतवाल जहाँगीर तडवी यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा कोतवाल जहाँगीर तडवी यांना मी मशिद जवळ आलो आहे असे सांगितले असता कोतवाल जहाँगीर तडवी यांनी मी तिथं येतो असे सांगितले.त्यानंतर फोन बंद केला. त्यानंतर कोतवाल जहाँगीर तडवी हे काही वेळाने सदर ठिकाणी आले. तेव्हा कोतवाल तडवी व माझेत माझे शेतीचे ७/१२ उता–यावरील इतर अधिकार नोंदीमधुन माझे बहिणेच नाव कमी करण्याचे प्रलंबित कामासंदर्भात चर्चा झाली.तेव्हा मी कोतवाल जहाँगीर तडवी यांना माझं काम होईल ना, पाच हजारात थोडं फार कमी जास्त करा असे सांगितले. त्यानंतर कोतवाल तडवी यांनी उजव्या हाताने व मानेने नकार दर्शवुन उजव्या हाताचे पाच बोटे दाखवुन ५०००/–रु.लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना किनगावला पैसे आणुन दिले तर चालतील ना असे विचारले असता त्यांनी चालेल असे सांगुन होकार दर्शविला. त्यानंतर मी व पंच क्र.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे, कोतवाल जहाँगीर तडवी यांचे सोबत झालेले संभाषण दोन्ही पंचानी, पोनि.एन.एन.जाधव मॅडम व सापळा पथकाने ऐकले. तेव्हा कोतवाल जहाँगीर तडवी यांनी माझे वर नमुद शेत जमिनीच्या ७/१२ उता–यावरील इतर अधिकार नोंद मधुन माझे बहीणीचे नाव कमी

यावल पो स्टे
CCTNS भाग 6
गुरन 89/2022
भ्र.प्र.कायदा
कलम 7,12
प्रमाणे
दि. 22/02/2022
रोजी नोंद क्र
16 वर
18.28 वा नोंद
घेतली आहे

पोलीस ठाणे अंमलदार
यावल,पो. स्टे. जि. जळगांव

सुपडु उत्तम पाटील

करण्याचे प्रलंबित काम मंडळ अधिकारी किनगांव यांचे कडून करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात माझे कडेस ५,०००/–रु. लाच रक्कम मागणी करीत केल्याबाबत खात्री झाली तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला ५,०००/–रु.हजर करण्यास सांगितले. तेव्हा मी माझे घर खर्चातुन आणलेले ५,०००/–रु त्यात ५००/–रु.दराच्या १० नोटा पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मी हजर केलेले ५,०००/–रु त्यात ५००/–रु.दराच्या १० नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटांची घडी करुन माझे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या.तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्र.१ यांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. नायगांव गावापासुन मंडळ अधिकारी किनगाव यांचे कार्यालय हे सुमारे दोन/अडिच कि.मी.असल्याने पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्र.१ यांना माझे जवळील मोटार सायकलने मंडळ अधिकारी कार्यालय,किनगाव येथे कोतवाल जहॉंगीर तडवी यांची भेट घेवुन लाचेची रक्कम देण्यासाठी पाठविण्याचे ठरविले. त्यांनतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले.त्यानंतर मला, पंच क्र.१ यांचेसह कोतवाल जहॉंगीर तडवी यांची भेट घेण्यासाठी मंडळ अधिकारी कार्यालय,किनगाव येथे माझे मोटार सायकलने पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे सापळा पथकापासुन माझे मोटार सायकलने निघुन मंडळ अधिकारी कार्यालय,किनगांव येथे गेलो. तेव्हा सदर ठिकाणी कोतवाल जहॉंगीर तडवी हे दिसुन आले नाही. त्यामुळे मी सदर ठिकाणाहुन माझे मोबाईल फोनवरुन कोतवाल जहॉंगीर तडवी यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा मी कोतवाल जहॉंगीर तडवी यांना कुठे आहे असे विचारले असता त्यांनी आडगावला असल्याचे सांगितले व मला वेळ लागेल असे सांगितले. त्यामुळे मी त्यांची वाट पाहीली. परंतु ते न आल्याने मी पुन्हा कोतवाल जहॉंगीर तडवी यांना फोन लावला व ऑफिसला येण्यास सांगितले असता त्यांनी पंधरा मिनीटात येतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.१ असे मंडळ अधिकारी कार्यालयाच्या बाहेरील विद्या जनरल स्टोअर्स जवळ उभे असतांना कोतवाल जहॉंगीर तडवी हे आले.तेव्हा मी कोतवाल जहॉंगीर तडवी यांची भेट घेवुन आपले काम शंभर टक्के होईल ना असे विचारले असता त्यांनी माझेवर भरोसा आहे का नाही?, दहा, पंधरा दिवस लागतील त्या कामाला असे सांगितले. तेव्हा मी माझे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिश्यात असलेली लाचेची रक्कम ५०००/–रु.त्यात (५०० रु.दराच्या १० नोटा) उजव्या हाताने बाहेर काढुन ती कोतवाल जहॉंगीर तडवी यांचे समोर धरली असता त्यांनी सदर लाच रक्कम जवळ असलेल्या विद्या जनरल स्टोअर्समध्ये बसलेल्या इसमाकडे बोट दाखवुन या टपरीमध्ये देवुन द्या असे सांगुन सदर इसमास महाजन दादा हे पैसे घेवुन घ्या असे सांगुन सदर लाचेची रक्कम मला त्यांचे जवळ देण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी सदर लाचेची रक्कम विद्या जनरल स्टोअर्समध्ये बसलेल्या महाजन नावाचे इसमास दिली व मोजुन घ्या असे सांगितले असता महाजन यांनी सदर लाचेची रक्कम त्यांचे दुकानाचे कॉऊन्टरवर ठेवुन घेतली. त्यानंतर मी लागलीच ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास इशारा केला.तेव्हा पो.नि.एन.एन.जाधव मॅडम व सापळा पथक यांनी कोतवाल जहॉंगीर तडवी व विद्या जनरल स्टोअर्समधील महाजन नावाच्या इसमास रंगेहाथ पकडले.

त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी कोतवाल जहॉंगीर तडवी व महाजन नावाचे इसमास आपली स्वत:ची तसेच पो.नि.एस.के.बच्छाव व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी कोतवाल जहॉंगीर तडवी यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव जहॉंगीर बहादुर तडवी, वय ५५, व्यवसाय नोकरी,कोतवाल मालोद सजा, ता.यावल जि.जळगांव असे सांगितले. त्यानंतर पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी महाजन नावाचे इसमास त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव मनोहर दयाराम महाजन, वय ४५,व्यवसाय जनरल स्टोअर्स रा.किनगांव ता.यावल जि.जळगांव असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात करण्यात आली.सदर कार्यालयातील एका रुममध्ये मनोहर महाजन,माझे व दोन्ही पंचांच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली.त्यानंतरची पुढील उर्वरीत सापळा कारवाई पो.नि.एन.एन.जाधव मॅडम यांनी केली आहे. तसा सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी क्र.१ जहॉंगीर बहादुर तडवी,कोतवाल मालोद सजा,ता.यावल यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन तसेच भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन माझे नमुद शेतजमिनीचे ७/१२ उता–यावरील इतर अधिकार नोंदीमधुन माझी बहिण कमलबाई लक्ष्मण पाटील हिचे नाव मंडळ अधिकारी किनगाव यांचेकडुन कमी करुन आणुन देतो असे सांगुन दि.२२.०२.२०२२ रोजी पंचासमक्ष माझेकडेस ५,०००/–रु.लाच रकमेची मागणी केली. त्यानंतर सदर लाच रक्कम आरोपी क्र.१ जहॉंगीर तडवी यांचे सांगण्यावरुन आरोपी क्र.२ मनोहर दयाराम महाजन,खाजगी इसम यांनी दि.२२.०२.२०२२ रोजी ११.२६ वा. किनगांव येथील मंडळ अधिकारी कार्यालया जवळील विद्या जनरल स्टोअर्स येथे स्वत: स्विकारली म्हणुन माझी दोन्ही आरोपींविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझे शिक्षण ४ थी पावेतो झाले असल्याने तसेच मी वयस्कर झालो असल्याने मला लिहीता येत नाही.त्यामुळे माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे कार्यालयातील संगणकावर टंकलीखीत केली आहे. माझी वरील नमुद फिर्याद मी स्वत: वाचुन पाहीली तसेच सदरची फिर्याद मला मराठी भाषेतुन वाचुन दाखविली. सदरची फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

फिर्यादीची सही

समक्ष

एन. एन. जाधव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

सुपडू उत्तम पाटील